<u>नियमित दिवाणी कज्जा नं.१३७/२०१२ मधील नि.क्र.११४ खालील</u>
<u>आदेश</u>
<u>(पारित दिनांक-१०/०१/२०२३)</u>

<u>महादेव ज्ञानू पाटील **वि.** विलास राजाराम पाटील.</u>

**CNR - MHKO130001222012**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचे अतिरिक्त सरतपासाचे शपथपत्र याकामी दाखल करण्याकरीता परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, वादीने याकामी दि. १८/०८/२०२२ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. तथापी, सदरचे शपथपत्र हे दावा दुरुस्त करण्यात आलेल्या पूर्वीच्या कथनास अनुसरून आहे. दावा दुरुस्ती नंतर सदर कथनास अनुसरुन वादीने अतिरिक्त सरतपास देणे गरजेचे आहे व ती परवानगी मागण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०३.** सदरच्या अर्जास प्रतिवादीने हरकत घेतली असून सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता मधील तरतुदीस अनुसरुन नाही. सदर अर्जास योग्य कारण नमुद केले नाही असे प्रतिवादीचे कथन आहे. तसेच, सदरचे प्रतिज्ञापत्र हे पूरवणी प्रतिज्ञापत्र आहे असे दिसून येत नाही. सदरचे प्रतिज्ञापत्र हे कायदेशीर तरतुदीस अनुसरुन नाही, अशा हरकती प्रतिवादीने याकामी उपस्थित केल्या असून त्याआधारे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. उभय बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** निश्चितपणे, उभय बाजुचे परस्पर विरोधी कथनाचे अवलोकन करता, वादीने या आधी दाखल केलेले सरतपासाचे शपथपत्र हे दाव्यामध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीस अनुसरुन नसून ते दुरुस्ती करण्यापूर्वीच्या कथनास अनुसरुन आहे असे कथन केले आहे. निश्चितपणे, दावा दुरुस्ती केल्यानंतर स्वतःची बाजु मांडण्याकरीता वादीस स्वतःचे सरतपासाचे शपथपत्रामध्ये अतिरिक्त कथने करायची आहेत. सदरची कथने अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादीस उलटतपास घेण्याची

संधी निश्चित मिळणार आहे. त्यामुळे, प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व नैसर्गिक न्यायतत्वाचा भंग याठिकाणी होणार नाही. त्यामुळे, सदरचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर घेणे योग्य राहील. तथापि, वादीच्या सदर कृत्यामुळे याकामी जो विलंब झाला आहे त्याबाबत वादीवरती काही रक्कम खर्च म्हणून बसविणे योग्य राहील. सबब, खालील आदेश पारीत करणेत येतो.

<u>- आ दे श -</u>

१) अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना आज तारखेपासून ०७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो व वादीचे अतिरिक्त सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन घेण्यात येते.

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.01.11 11:34:40 +0530

कागल **(अमोल भारत जवळे)**

दिनांकः– १०/०१/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कागल.